**सी.एन.आर. नं. एमएचएसआय ०७ —००००११—२०१०**
**नि.दि.मु.क्र. ३५/२०१० मधील नि.क्र. २२४ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा वाटप होवून मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १३ अ याने नि.क्र. १ वरील त्याच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील सदर प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील कारणांचा विचार होवून नि.क्र. १ वर त्याच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा झालेला आदेश रद्दबातल होवून त्याचे वकीलपत्र, पत्तायादी व कैफियत स्वीकारण्याचा आदेश व्हावा. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

०३. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १३ अ याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश नि.क्र. १ वर दि. २३/०८/२०१८ रोजी पारीत झालेला आहे. सदरील आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी त्याने दि. २९/१०/२०१८ रोजी प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक नाहीत. परंतु, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, वरीलप्रमाणे आदेश रद्दबातल करणे उचित राहील. प्रतिवादी क्र. १३अ याने कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब पाहता; त्याच्यावर रक्कम रुपये २००/— इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवविण्याचा आदेश करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १३अ याच्यावर रक्कम रु. २००/— (रक्कम रुपये दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. २३/०८/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १३अ याच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १३अ याने वादीस पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—१७ डिसेंबर, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.